# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


**दिनांक २५/०४/२०२४ (गुरूवार) सायंकाळ**

---

## अवैधरीत्या विनापरवाना देशी दारू बाळगुन मोटरसायकलवर वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

दिनांक २४/०४/२०२४ रोजी मा. उपविभागीय पोलीस अधिकारी सावनेर विभाग सावनेर यांचे आदेशाने स्टाफ अवैध धंदयांवर कारवाई करणेसाठी मोहपा शिवारात फिरत असता मुखबिरद्वारे विश्वसनिय माहीती मिळाली की एक ईसम मोटरसायकलवर समोर पेट्रोल टैंकवर हिरव्या रंगाची थैली ठेवुन त्यामध्ये देशी दारू घेवुन मोहपा गावातुन कोहळी गावाकडे जाणाऱ्या रोडने जात आहे. अशा मिळालेल्या माहिती वरून पोलीस चौकी मोहपाचे समोरच असलेल्या चौफुली रोडवर जावुन नाकाबंदी केली असता हिरो अचिव्हर कंपनीची मोटरसायकल क्र. एम. एच–४०/ए. वाय–४३६२ चा चालक **आरोपी नामे– मनोज दामोधर पांडे, वय ३९ वर्ष, रा. हनुमान मंदीर जवळ मोहपा** याचे ताब्यातील मोटरसायकलवर असलेल्या थैलीची पाहणी केली असता त्यामध्ये अवैधरीत्या विनापरवाना १) १८० मिली क्षमतेच्या देशी दारू भिंगरी संत्र नं. ०१ असे कागदी लेबल असलेल्या प्लास्टीकच्या ९६ निपा प्रत्येकी किंमती ७०/–रू. एकुण किंमती ६७२०/–रू. २) एक हिरो अचिव्हर कंपनीची मोटरसायकल क्र. एम एच– ४०/ए. वाय– ४३६२ किंमती ३५,०००/– रू चा असा एकुण ४१२७०/– रुपयाचा मुद्देमाल अवैधरित्या विनापरवाना वाहतुक करतांना मिळून आल्याने जप्त करण्यात आला. आरोपीविरूद्ध कलम ६५(ई), ६५(अ) महाराष्ट्र दारूबंदी कायदा अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक सा. नागपूर (ग्रामीण) श्री. हर्ष पोद्दार (भा.पो.से.) तसेच अपर पोलीस अधीक्षक श्री. रमेश धुमाळ, मा. सहायक पोलीस अधीक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी सावनेर विभाग सावनेर श्री. अनिल म्हस्के यांचे मार्गदर्शनात पोलीस हवालदार अनिल मुंढे, संजय वानखेडे, पोलीस अंमलदार पियुष वाढीवे, नितेश पुसाम यांनी केली.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर